REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# नेहरू रिपोर्ट : एक राजकीय दृष्टिक्षेप

प्रा.दत्तात्रय रामचंद्र साळुंके
एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालय, वरवंड, ता.दौंड, जि.पुणे.

## १. प्रस्तावना —

भारतीय राज्यघटनेच्या सोपपत्तिक इतिहासाच्या वाटचालीमध्ये नेहरू रिपोर्ट' हा महत्वाचा टप्पा मानला जातो.भारतीय राज्यघटनेचा पहिला मसूदा स्वातञ्य्पूर्व काळात नेहरू रिपोर्टच्या रूपाने लिहीला गेला. सन १९२७ मध्ये ब्रिटीश संसदेने हिंदी राज्यघटना ठरविण्यासाठी सायमन कमिशन नेमले. त्यात हिंदी सभासद नसल्याने हिंदी लोकांनी सायमन कमिशनला सहकार्य केले नाही. भारतमंत्री बर्कनहेड यांनी हिंदी लोकांनी राज्यघटना बनवून दाखवावी असे आव्हान दिले. देशातील हिंदी—मुस्लीम तेढ व पक्षीय मतभेद यामुळे भारतीयांना एकमताने राज्यघटना बनविता येणार नाही अशी बर्कनहेड यांची खात्री होती.

## २. राज्यघटना समितीची स्थापना व कार्य—

बर्कनहेडचे आव्हान स्विकारून भारतातील सर्व पक्षीयांची सभा १९ मे १९२८ रोजी कॉग्रेस अध्यक्ष डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षखाली मुंबई येथे बोलावली. या सभेत भावी राज्यघटनेचा विचार झाला. व सर्वपक्षीय एक समिती नेमली. या समितीमध्ये पं.मोतीलाल नेहरू (अध्यक्ष), सुभाषचंद्र बोस, सर तेजबहाद्दुर सपु, लोकनायक बापूजी अणे, सरदार मंगलसिंग, सर अली इमान शेख कुरेशी व रावबहाद्दुर जी. आर. प्रधान इ.आठ सदस्याचा समावेश होता. या समितीने देशभर फिरून मान्यवरांची मते आजमावून सर्वमान्य होईल अशी राज्यघटना तयार केली. लखनौच्या दि. १० ऑगस्ट १९२८ च्या सर्वपक्षीय सभेत संमत करून घेतली. अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी हा अहवाल ब्रिटीशांकडे सादर केला, त्यामुळे तो नेहरू रिपोर्ट या नावाने ओळखला जातो.

## ३. नेहरू रिपोर्टमधील तरतूदी—

१) हिंदी लोकांना वसाहतीचे स्वराज्य दयावे.

२) भविष्य काळात भारतात संघराज्य बनविण्यात यावे. केंद्रीय सत्ता व प्रांतीय सत्ता यांच्यात अधिकाराची विभागणी करावी. शेषाधिकार केंद्राकडे असावेत.

३) केंद्रामध्ये व्दिगृही कायदेमंडळ असावे. वरिष्ठ सभागृहामध्ये प्रांतीय कायदेमंडळाकडून निवडले गेलेले २०० प्रतिनिधी असावेत. त्याची मुदत ७ वर्षे असावी. कनिष्ठ सभागृहात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रौढ मतदान पद्धतीने निवडलेले ५०० प्रतिनिधी असावेत त्यांची मुदत ५ वर्षे असावी.



४) पंतप्रधानाची नेमणूक गव्हर्नल जनरलने करावी व आपले सहकारी कायदेमंडळातून निवडावेत. मंत्रिमंडळ कायदेमंडळास जबाबदार असावे. घटनात्मक प्रमूख या नात्याने गव्हर्नर जनरलला सभा बोलावणे, स्थगित अधिवेशन करणे व बरखास्त करणे, कायदेमंडळाने मंजूर केलेल्या बिलास अंतिम मान्यता देणे इ. अधिकार असावेत.

५) प्रांतिक कायदेमंडळ प्रौढ मतदानाने निवडावे. प्रांताच्या गव्हर्नरने सभागृहास अशा मुख्य मंत्र्यांची नेमणूक करावी. या कायदेमंडळाची मूदत ५ वर्षे असावी.
ती मुदत कमी जास्त करण्याचा कायदेमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा स्थगित
वा बरखास्त करण्याचा अधिकार गव्हर्नरला असावा
६) जनतेला सर्व प्रकारचे मूलभूत अधिकार असावेत जनता सार्वभौम असून जनतेचा स्वातंत्रय हिरावून घेण्याचा अधिकार कोणासही नसावा धर्म स्वातंत्रय, भाषण स्वातंत्रय, संचार स्वातंत्र्य, पिळवणूकी विरूद्ध दाद मागण्याचा अधिकार इ हक्क जनतेस असावेत
७) भाषावार प्रांतरचना, प्रौढ मतदान पद्धती, नागरी अधिकार असावेत. सर्व देशासाठी सुप्रीम कोर्टाची स्थापना करण्यात यावी.
८) जातीय मतदारसंघ रद्द करण्यात यावेत. मात्र अल्पसंख्याकांसाठी काही राखीव जागा असाव्यात.पंजाब व बंगाल प्रांतात राखीव जागा असू नये
९) वायव्य सरहदद प्रांतास गर्व्हनरच्या प्रांताचा दर्जा देण्यात यावा. सिंध मुंबई प्रांतातून वेगळा करावा व देशी संस्थानांनी संघराज्यात सामील व्हावे.
१०) लष्करी व्यवस्थेसाठी गव्हर्नर जनरलने एक संरक्षण विषयक समिती नेमावी. या समितीमध्ये संरक्षणमंत्री परराष्ट्रमंत्री भारताचा सरसेनापती तिन्ही लष्करी दलांचे प्रमुख असावेत . पंतप्रधान या समितीचा प्रमुख असावा या समितीला संरक्षण विषयक सल्ला देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला असावा.

## ४. नेहरू रिपोर्टचे मूल्यमापन —:

राज्यघटना समितीने तयार केलेल्या नेहरू अहवालावर चर्चा करण्यासाठी २२ डिसेंबर १९२८ रोजी कलकता येथे सर्वपक्षीय अधिवेशन बोलविले होते नेहरू रिपोर्ट मुस्लिम लीगने अंश:त स्विकारला या अधिवेशनात मुस्लिमलीगाच्या वतीने बॅ. जीनाने काही दुरूस्त्या सुचविल्या पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अहवालातील वसाहतीच्या स्वराज्यास विरोध करून संपूर्ण स्वराज्याची मागणी केली महात्मा गाधीजींनी वरील नेत्याचे समाधान करून कॉग्रेसतर्फे अहवालास मंजूरी करून घेतली मात्र हा अहवाल ब्रिटिश संसदेने ऐका वर्षाच्या आत मंजूर करून त्याची अमलबाजावणी केली नाही तर तो अहवाल कॉग्रेसवर बंधनकारक राहणार नाही असे जाहिर केले. बॅ. जीनाचे देखील नेहरू अहवालातील अल्पसंख्यांकाच्या अधिकाराबाबत समाधान झाले नव्हते. त्यांनी मुस्लीमांच्या १४ मागण्या मान्य केल्यावरच आमचा नेहरू अहवालास पाठिंबा राहिल असे जाहिर केले. अशाप्रकारे मुस्लीम लीगने नेहरू अहवालाची मान्यता काढून घेतल्या ब्रिटीश सरकारला हा अहवाल स्विकारावास वाटला नाही.

नेहरू अहवाल भारताच्या संभाव्य राज्यघटनेसाठी मार्गदर्शक असा होता. अल्पसंख्याबाबत या अहवालात सकारात्मक भूमिका घेतली होती मात्र पूर्ण स्वातंत्रयाचा उल्लेख यात नव्हता एकंदर हा अहवाल म्हणजे ब्रिटीशांचे यशस्वीतणे स्विकारलेले आव्हान होते मात्र हा अहवाल सगळयांचेच समाधान करू शकला नाही. ब्रिटीशांनी याला मान्यता न दिल्याने अहवालाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

## संदर्भ

१) गायकवाड रा ज्ञा, 'भारताचा राजकीय घटनात्मक इतिहास'
२) घारे ओतूरकर, भारतीय राज्यघटनेचा सोपपत्रिक इतिहास
३) पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्रयाचा इतिहास
४) कोठेकर शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास'
५) कोलारकर श. गो 'आधुनिक भारत'
६) जावडेकर, 'आधुनिक भारत'.